महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांकः-तंशिस/शैवि/ परदेशी शिष्यवृत्ती /२०२३-२४/ 2763 दिनांकः- 30 AUG 2023

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित,खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
**पदविका संस्था,**
नागपूर विभाग. नागपूर

विषयः- सरोजिनी दामोदर फाऊंडेशन विद्याधन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती कार्यक्रमाबाबत.

संदर्भः- मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१७/तंशिसं /विद्याधन/ शिष्यवृत्ती २०२३/२३६/दि. २८/०८/२०२३

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येत आहे की, संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे आर्थि क दृटया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांचे कौटुबिक उत्पन्न रू. 2.00 लाखापेक्षा कमी आहे व ज्या विद्यार्थ्यांनी वर्ष 2023 मध्ये SSC परीक्षा 85 टक्कयापेक्षा अधिक किंवा 8.5 CGPA गुणांनी उत्तीर्ण केलेली आहे. अशा पदविका अभ्यासक्रमां मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता "सरोजिनी दामोदर फाऊंडेशन विद्याधन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती" लागु करण्यात आलेली आहे.

तरी सदर शिष्यवृत्तीचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याच्या दृष्टीकोनातून संस्थांस्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी. ( योजनेचे माहिती पत्रक संलग्न )

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षणविभागीयकार्यालय,
नागपूर

सहपत्रः- (संदर्भिय पत्र क्र. ०१ संलग्न )

Vidyadhan

Transforming lives through education

A Shibulal Family Philanthropic Initiative

Vidyadhan is a pan India higher education scholarship offered by Sarojini Damodaran Foundation set up by Mrs. Kumari Shibulal (Managing Trustee) and Mr. SD Shibulal (Co-founder and ex-CEO Infosys). Vidyadhan has distributed over 33200 scholarships since its inception in 1999. There are currently around 6500 scholars in Kerala, Karnataka, Tamil Nadu, Puducherry, Andhra Pradesh, Telangana, Gujarat, Maharashtra, Goa, Odisha, New Delhi, Ladakh, Bihar and Jharkhand.

## VIDYADHAN SCHOLARSHIP APPLICATIONS 2023 FOR MERITORIOUS STUDENTS FROM ECONOMICALLY DISADVANTAGED FAMILIES ARE NOW OPEN.




2023 Scholarship Applications open for Maharashtra.

For Inquires: vidyadhan.maharashtra@sdfoundationindia.com

Call: 9663517131 (Help Desk Number)

Apply Online: www.vidyadhan.org

**Last Date: 10th Sept 2023**

SDF doesn't charge any fee for application/Test/Interview.

### ELIGIBILITY CRITERIA:

- Family Annual Income less than Rs.2 Lakhs
- Student Who Have Passed 10th Exam in 2023
- More than 85% or 8.5 CGPA Marks(75% or 7.5 CGPA FOR STUDENTS WITH DISABILITY)

### REQUIRED DOCUMENTS:

- Income Certificate
- 10th Grade Marksheet
- Passport Size Photo
- Email ID in the Name of student

SCHOLARSHIP TILL COMPLETION OF PUC AND GRADUATION BASED ON MERIT

**Students can apply free of cost, and we have not authorized anybody else for selection**

Vidyadhan
Transforming lives through education
A Shibulal Family Philanthropic Initiative

सरोजिनी दामोदरन फाउंडेशन द्वारे दिली जाणारी विद्याधन ही संपूर्ण भारतातील उच्च शिक्षण शिष्यवृत्ती आहे. सरोजिनी दामोदरन फाउंडेशनची स्थापना १९९९ मध्ये श्री. एस. डी. शिबुलाल (सहसंस्थापक, इन्फोसिस) आणि श्रीमती कुमारी शिबुलाल (व्यवस्थापकीय विश्वस्त) यांनी केली होती. आजपर्यंत फाउंडेशनने केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, महाराष्ट्र, गोवा, ओडिशा आणि दिल्ली येथे ३३,२०० हून अधिक शिष्यवृत्ती वितरित केल्या आहेत. कार्यक्रमात सध्या ६५०० हून अधिक विद्यार्थी आहेत.

**गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विद्याधन शिष्यवृत्ती अर्ज २०२३**
**आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबांसाठी आता खुले आहेत.**




**२०२३ शिष्यवृत्ती अर्ज महाराष्ट्रासाठी खुले आहेत.**

चौकशीसाठी: vidyadhan.maharashtra@sdfoundationindia.com

संपर्क क्रमांक: +९१९६६३५१७१३१

**ऑनलाइन अर्ज करा : www.vidyadhan.org**

**शेवटची तारीख: १० सप्टेंबर, २०२३**

विनामुल्य अर्ज करा. SDF अर्ज/ चाचणी/मुलाखतीसाठी कोणतेही शुल्क आकारत नाही.

**पात्रता निकष:**

- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न 2 लाख रु. पेक्षा कमी
- जे विद्यार्थी २०२३ मध्ये १० वीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.
- २०२३ मध्ये १०वीची परीक्षा ८५% किंवा ८.५ CGPA पेक्षा जास्त गुण (दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ७५% किंवा ७.५ CGPA)

**आवश्यक कागदपत्रे:**

- विद्यार्थ्याच्या नावे उत्पन्नाचा दाखला
- 10वी इयत्तेची गुणपत्रिका
- पासपोर्ट आकाराचा फोटो
- विद्यार्थ्याच्या नावाने ईमेल आयडी

१२वी आणि पदवी पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्ती गुणवत्तेवर आधारित

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९

ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/विद्याधन/शिष्यवृत्ती/२०२३/२३६

दिनांक : 28 AUG 2023

प्रति,
**सहसंचालक,**
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय : सरोजिनी दामोदरन फाऊंडेशनच्या विद्याधन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती कार्यक्रमाबाबत...**

**संदर्भ** : Sarojini Damodaran Foundation यांचा दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीचा ई-मेल

शासकीय संस्थांमधून पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी Sarojini Damodaran Foundation या संस्थेव्दारे उच्च शिक्षणासाठी विद्याधन शिष्यवृत्ती देण्यांत येणार असल्याचे संबंधित संस्थेने उपरोक्त ई-मेल व्दारे कळविले आहे.

सदरच्या शिष्यवृत्तीसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न रु. २.०० लाखापेक्षा कमी आहे व ज्या विद्यार्थ्यांनी वर्ष २०२३ मध्ये SSC परीक्षा ८५ टक्क्यांपेक्षा अधिक किंवा ८.५ CGPA गुणांनी उत्तीर्ण केलेली आहे (शारीरिक दृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांसाठी ७५ टक्के किंवा ७.५ CGPA) अशा विद्यार्थ्यांना वार्षिक रु. १०,०००/- इतकी शिष्यवृत्ती देण्यांत येणार आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची मुदत **दिनांक १० सप्टेंबर, २०२३ पर्यंत** असून, विद्यार्थ्यांनी www.vidyadhan.org या संकेतस्थळावरुन अथवा गुगल प्ले स्टोअर वर उपलब्ध असलेल्या SDF Vidya App या ॲप वरुन ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे. तसेच विद्यार्थी अधिक माहितीसाठी ९६६३५१७१३१ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील पदविका अभ्यासक्रमाच्या शासकीय संस्थांच्या प्राचार्यांना याबाबत कळवून त्यांना त्यांच्या संस्थेत प्रथम वर्षात शिकत असलेल्या उपरोक्त अटी पूर्ण करणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्तीचा लाभ घेण्याबाबतच्या सूचना देण्यांत याव्यात.

सोबत : योजनेचे माहितीपत्रक

(डॉ. सुनिल भामरे)
सहसंचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई



E:\desk-19\Mali\TEQIP Letter-2023.doc